म. ग्रं. सं. ठाणे
लेखक माधव नारायण पारणकर
संग्रहालय क्रमांक १०४ / ९९०
पुस्तकाचें नांव राष्ट्रीय सभा व तिच्यापासून होणारे फायदे

१०४
सं.क्र.

# राष्ट्रीय सभा व तिच्यापासून होणारे फायदे.

निबंध

सं.नि. ८३

# राष्ट्रीयसभा

व

## तिच्यापासून होणारे फायदे

---

मित्रहो, जो हिंदुस्थान देश पूर्वी लक्ष्मीचें वसतिस्थान ह्मणून ख्यात असे, ज्या देशांतील लोक सुखी, संपत्तिमान ह्मणून सर्व लोक जाणत असत, त्याच महादेशाची आजची स्थिति पाहिली तर पूर्वीच्या अगदीं उलट अनुभव येतो. जो देश लक्ष्मीचें वसतिस्थान असे, तें नाहींसें होऊन तिच्या वडील बहिणीनें आपलें नांदतें घर करून ठेविलें आहे. जेथील लोक पूर्वी सुखी असत तेथीलच आतां दुःखी झाले आहेत. आतां कालचक्राप्रमाणें ही स्थिति येणारच, असा कोणी भविष्यवादी मनुष्यानें पूर्वी सिद्धांत करून ठेविला होता व तो खरा झाला, त्याबद्दल दुःख करून काय उपयोग! हल्लींच्या स्थितीच्या ज्ञानानें ह्या दुःसह स्थितींतून मुक्त होण्याकरितां कांहीं तरी उपाय केले पाहिजेत, असा सुज्ञ लोक सर्वांना उपदेश करितात. आणि तो बऱ्याच अंशानें निर्विवादही आहे. ज्या देशामध्यें गोरगरिबांचे घरींसुद्धां धान्याचीं कोठारें असत, तेथें आतां टोपल्यांतून धान्य ठेवण्याची पाळी आली आहे; जेथील लोक पूर्वी रानांतून उदरपोषणाकरितां लांकूडफांटा वगैरे आणून तो विकून मोठ्या आनंदानें निर्वाह करीत असत, त्याच लोकांना फारेस्टरूपी राक्षस आ पसरून तो तोंडांत टाकण्याकरितां टपून बसला आहे; जेथील लोक समुद्राच्या पाण्यापासून मीठ स्वतःच्या श्रमानें उत्पन्न करून शरीररक्षणास अवश्यक अशा पदार्थाची आपल्या घरांत समृद्धि करीत असत, त्याच देशांतील लोकांस सॉल्टटॅक्सरूपी राहू ग्रासून टाकीत आहे; ज्या आपल्या पूर्वजांनीं भारती युद्धांत व शें दीडशें वर्षांपूर्वी समशेर हातांत घेऊन तिच्या प्रतापावर दिगंत कीर्ति संपादन केली, त्याच आपल्या पूर्वजांच्या वंशजांच्या

हातांत बांगड्या भरून अज्ञात वासांतील अर्जुनाप्रमाणें हत्यारांच्या कायद्यानें आपली स्थिति करून टाकली आहे; इत्यादि जी आपली दुर्दशा होत चालली आहे तिच्यापासून दूर होण्यास कांहींतरी साधनाची विशेष अवश्यकता आहे, व ही जी आपली अति शोचनीय स्थिति झाली आहे ही आपण होऊन सरकारला कळविल्याशिवाय गत्यंतर नाहीं. कारण, सरकार परदेशीय, परधर्मीय, परजातीय असून भाषासुद्धां त्यांची आपली एक नाहीं. तेव्हां आपण योग्य तऱ्हेनें सरकारच्या कानावर आपली स्थिति घातलीच पाहिजे व तशी सरकारच्या कानावर आपली स्थिति घालावयाची ह्मणजे राष्ट्रीय सभेसारखा दुसरा मार्गच सांपडणार नाहीं. ह्या संस्थेनें आजपर्यंत सरकाराजवळ ज्या मागण्या केल्या त्यांपैकीं बऱ्याच मागण्यांचा सरकारनें विचार केला, व कांहीं कबूलही केल्या आहेत. अशी ही उपयुक्त संस्था आज आपल्या देशाचें आदिदैवतच बनत चालली आहे. आतां तर, कोणत्याही संस्थेकडे पाहिलें असतां त्या एकदेशीय किंवा एकजातीय असतात, तसा ह्या संस्थेंत कोणताही दोष नाहीं. ही सर्व लोकांना सारखी उपयोगी व कल्याणकारक आहे. हिंदु, मुसलमान, पार्शी, ख्रिश्चियन, ज्यू, इस्रायल, इत्यादिंपैकीं कोणत्याही जातीचा मनुष्य असला तरी जें एका जातीच्या मनुष्याचें हिच्यापासून कल्याण होणार तेंच दुसऱ्या जातीच्या इसमाचें होणार, ह्मणून हिला सर्व लोक अनुकूल असून तन मन धन हिला अर्पण करून हिच्याकरितां ते झटत आहेत. कांहीं आंग्लो-इंडियन लोक असें ह्मणतात कीं, ह्या सभेस मुसलमान लोक अनुकूल नाहींत. हा त्यांचा आक्षेप एकदम खोडून टाकण्याला आमच्याजवळ पुष्कळ प्रमाणें आहेत, त्यांपैकीं एक दोन येथें देतों.

आपली तिसरी ह्मणजे सन १८८७ सालची मद्रास येथें जी राष्ट्रीय सभा भरली होती त्या सभेचे अध्यक्ष नामदार **बद्रुद्दीन तय्यबजी** ह्यांनीं आपल्या भाषणांत स्पष्ट असें सांगितलें आहे कीं, "मुसलमान लोक ह्या **राष्ट्रीयसभेपासून** अलग आहेत असें जें कित्येक ह्मणतात, तें निव्वळ खोटें आहे. कारण, ह्या सभेच्या अध्यक्षस्थानाचा मीं, माझी प्रकृति बरी नसतांही, जो स्वीकार केला तो फक्त ह्या उत्कट इच्छेनें केला कीं, मी स्वतः तर ह्या सभेचा भक्त आहेंच; पण ज्या **अंजूमान-इ-इस्लाम** नामक मुसलमान सभेनें मला येथें पाठविलें आहे ती सभा देखील राष्ट्रीय सभेस अनुकूल आहे असें जगजाहीर व्हावें. मुंबई, मद्रास, बंगाल, वायव्यप्रांत, वगैरे ठिकाणचे मुसलमान लोक असेंच ह्मणणारे आहेत. उत्तर हिंदुस्थानांत **रिफा-इ-आम** या नांवाची एक मुसलमान लोकांची सभा आहे तिचे अध्यक्ष **शेख रेझा हुसेनखान** यांनीं एकदां असें बोलून दाखविलें होतें कीं, "ही **राष्ट्रीय सभा** मुसलमान लोकांची नव्हे असें ह्मणणारे जे कोणी असतील त्यांनीं आमच्या पुढें यावें, ह्मणजे त्यांच्या या असत्य वचनाच्या चिंधड्या उडविण्यास, एक नव्हे, दोन नव्हे, तर पन्नास हजार मुसलमान लोक **राष्ट्रीय सभेस** अनुकूल असल्याबद्दल सह्या देण्यास तयार आहेत."



या दोन सद्गृहस्थांच्या उद्गारांवरून सर्व ठिकाणचे मुसलमान लोक ह्या सभेस अनुकूल आहेत, असें आपणांस दिसून येतें.

तसेंच कांहीं लोक असें ह्मणतात कीं, ही सभा बंगाली बाबूंची आहे, हींत शीख लोक नाहींत. हेंही ह्मणणें खोटें आहे असें सिद्ध करण्यास आमच्याजवळ पुरावा आहे. पंजाबांत **डेराइस्माइलखान** नांवाचें एक शहर आहे. तेथून **मालिक भगवानदास** ह्या नांवाचे एक पंजाबी गृहस्थ प्रतिनिधि ह्मणून दर वर्षी राष्ट्रीय सभेस येत असतात. त्यांनीं एकदां वरील आक्षेपाच्या संबंधानें सांगितलें कीं, "ज्यांस ही **राष्ट्रीय सभा** फक्त बंगाली बाबूंचीच आहे असें वाटत असेल, त्यांनीं माझ्याकडे पहावें; मी जर त्यांस बंगाली बाबू दिसलों, तर त्यांनीं खुशाल तसें ह्मणावें! पण मजकडे पाहिल्याबरोबर त्यांस मी एक पंजाबी गृहस्थ आहे असें वाटल्याशिवाय राहणार नाहीं व यापासून त्यांनीं असें पक्कें समजावें कीं, मी एकटाच पंजाबी या राष्ट्रीय सभेचा भक्त नसून माझे सर्व पंजाबी बांधव हिचे पूर्ण भक्त आहेत." ह्यावरून वरचा दुसरा आक्षेपही

व्यर्थच आहे.

ह्या सभेस मोठमोठे साहेब लोकही अनुकूल आहेत. आपल्या देशांत सरकारी नौकरींत पुष्कळ दिवस राहिलेले असे मिस्तर **आलन ओ. ह्यूम** हे तर ह्या सभेचे मूळ उत्पादक असून ते तिचे जनरल सेक्रेटरी आहेत. तसेंच मद्रासचे **नार्टन, अडाम,** अलहाबादचे मि. **हावर्ड,** मुजफरपूरचे **मिंगल केनडी** आणि मि. **क्रौले,** क्यापटन **बेनन,** रेवरेन्ड **ईव्हान्स** वगैरे युरोपिअन लोक ह्या **राष्ट्रीय सभेचे** भक्त आहेत. तसेंच विलायतेंतही नामदार **वेडरबर्न,** नाम. **केन, डिग्बी, एलिस** व आयरिश मेंबर नाम. **वेब** हे ह्या सभेचे पूर्ण भक्त असून काया वाचा मनेंकरून झटत असतात. हिंदुस्थानांतील सर्व सरदार, जहागीरदार वगैरे व महाराज सयाजीराव गायकवाड, म्हैसूरचे कै० महाराज, त्रावणकोरचे महाराज, कोचीन, विजयानगर, वगैरे ठिकाणचे राजेसाहेब, त्रिपतीचे महंत, वगैरे सर्वजण हिला अनुकूल असून मदतही करितात. तात्पर्य, ही **राष्ट्रीय सभा** सर्व ठिकाणच्या, सर्व धर्मांच्या, सर्व जातींच्या लोकांस पसंत आहे, हें अगदीं निर्विवाद आहे.

आतां अशा तऱ्हेनें सर्व लोकांना पसंत अशी जी ही आपली **राष्ट्रीय सभा** तिच्या पासून आपले फायदे बरे काय होणार? असा प्रश्न सहजीं मनांत येतो. कांहीं निंदक लोक असें म्हणतात कीं, देशांतील मोठमोठे पैसेवाले लोक वर्षांतून चार दिवस एक ठिकाणीं जमतात, गप्पागोष्टी ठोकतात, खातात, चैन करतात व चालते होतात. विनाकारण गोरगरीबांपासून पैसे मात्र घेतात, पण त्यांच्या दुःखांकडे हे लोक बिलकुल पहात नाहींत. मित्रहो, असें म्हणणारे जे लोक असतील ते आमच्या राष्ट्रीय सभेच्या हकीकतीकडे अगर तिच्या प्रयत्नांकडे बिलकूल लक्ष देत नाहींत, असेंच म्हटलें पाहिजे. जर आमचे विद्वान पुढारी नुसत्या चैनीकरितां चार दिवस एके ठिकाणीं जमते, तर आज ११ वर्षें जी ही सभा वाढत्या प्रमाणानें भरत असते ती भरलीच नसती. ज्या गरीब प्रजेपासून पै पैसा वर्गणी

नि. १०८



जमवितात, त्यांच्याच सुख दुःखांचा विचार या सभेंत होत असतो. असें पहा कीं, मीठ प्रत्येक मनुष्याला अवश्य असून सरकारानें त्याच्यावर जबर कर बसविल्यामुळें जरी तें महाग झालें आहे तरी तें कोणाला? आमच्या राष्ट्रीय सभेस येणाऱ्या ठिकठिकाणच्या मुखत्यारांना? नाहीं. त्यांना तें विपुल मिळत आहे, त्यांचे जवळ पैसे पुष्कळ आहेत, २५ रुपयांचें मीठ लागत होतें तेथें आतां ७० रुपयांचें लागेल तरी ते त्याची पर्वाही करीत नाहींत; तर ज्या गरीब व दीन प्रजेच्या तर्फे ते मुखत्यार म्हणून येतात त्यांना मीठ मिळत नाहीं व म्हणूनच ते मिठावरील कराच्या संबंधानें **राष्ट्रीय सभेच्या** द्वारें सरकारला दर वर्षीं विनंति करतात कीं, मायबाप सरकार! आह्मां गरीब प्रजेचें मीठ तरी तोडूं नका.

पूर्वीं मीठ रुपयास १०-१२ पायल्या मिळत असे व त्यामुळें थोड्या पैशांत प्रत्येकाच्या प्रपंचाची बेगमी होऊन गुरांढोरांसही घालावयास सांपडत असे. पण हल्लीं तें १० शेर मिळण्याची पंचाईत झाली आहे. मीठ इतकें महाग होण्यास सरकारचा जबर कर हें मुख्य कारण आहे. यासंबंधानें, मुंबईचे **दिनशा एदलजी वाच्छा मिंगल के ी,** वगैरेंनीं फार सुंदर व कळकळाचीं भाषणें करून सरकारचे मनाला द्रव उत्पन्न होईल अशा तऱ्हेनें, मिठामुळें होत असलेली दुर्दशा सरकारच्या कानावर घातली आहे व सरकारानें त्यांच्या ह्मणण्याचा विचार करूं असें वचन दिलें आहे.

दुसरी गोष्ट अशी कीं, हल्लीं फारेस्ट खात्यामुळें लोकांना फार त्रास होतो तो कोणाला? तर आमच्या **सुरेंद्रनाथ बानर्जी** किंवा **लाला मुरलीधर,** किंवा नामदार **मेथा,** अगर **टिळक** यांना होत नाहीं. त्यांना जंगलांत लांकडाकरितां जाण्याचा कधींही प्रसंग येत नाहीं. तर जे गरीब शेतकरी कवळकाठी आणण्याकरितां रानांत नेहमीं जातात अगर ज्यांचीं गुरें जंगलांत नेहमीं चरावयास सोडावयाचीं असतात अशा गरीब शेतकरी लोकांनाच त्रास होतो व तो त्यांचा त्रास नाहींसा व्हावा ह्मणूनच आमचे मुखत्यार **राष्ट्रीय सभेंत**

टाहो फोडून सरकारला कळवितात कीं, जंगलसंबंधानें होत असलेला अन्याय नाहींसा करून गरीब शेतकऱ्यांनां कांहीं तरी सवलती द्या.

ह्या कायद्यामुळें गुरांना चारा बिलकूल मिळेनासा झाला आहे. याबद्दल नागपूर येथें भरलेल्या **राष्ट्रीय सभेंत** मद्रास इलाख्यांतील मुखत्यार **पालीपटर पिल्हे** ह्यांनीं त्या प्रांतांतील गुरांचा ह्या कायद्यामुळें कसा संहार होतो हें उघड करून सांगितलें. ते ह्मणाले कीं, "१८९१ च्या जानेवारीपासून ८ महिन्यांत फक्त अर्काट प्रांतांत तीन लाख गुरें चारा न मिळाल्यामुळें मरण पावलीं!!" हरहर! केवढा हा अनर्थ!!! अशा रीतीनें आमचीं गुरें जर मरतील तर आमची शेती चालावी कशी व आह्मांला दूध, दहीं, वगैरे पदार्थ मिळून आमची शक्ति तरी वाढावी कशी? तेव्हां ही गरीब शेतकऱ्यांची होत असलेली दुर्दशा नाहींशी होऊन त्यांना कांहीं सवलती मिळाव्या ह्मणून आपल्या राष्ट्रीय सभेचे सारखे प्रयत्न चालले आहेत तेव्हां अशा तऱ्हेनें जी **राष्ट्रीय सभा** खरोखर आपल्या हिताकरितां झटत आहे तिच्यांतील लोक नुसत्या चैनीकरितां एके ठिकाणीं जमतात हें ह्मणणें ह्मणजे अधमपणाचें कृत्य नाहीं कां होणार?

तसेंच हत्यारांच्या कायद्यांत सुधारणा करण्यासाठीं आपली राष्ट्रीय सभा सरकाराला सारखी विनंति करीत असते, ती तरी गरीब लोकांकरितांच. या हत्यारांच्या कायद्याबद्दल मोठ्या कळकळीचीं भाषणें ह्या सभेंत अनेक झालीं आहेत. **बाबू बिपिन चंद्रपाल** यांनीं एकदां असें म्हणून दाखविलें होतें कीं, सरकार कांहीं दिवसांनीं बोलण्याचें हत्यार जीभ व लिहिण्याचें हत्यार लेखणी यांचाही ह्या हत्यारांच्या कायद्यांत समावेश करील कीं काय याची मोठी भीति आहे? रानांत वगैरे गरीब लोकांचीं गुरें चरत असतांना त्यांच्यावर हिंस्र पशूंची धाड येऊन किती तरी गुरें मृत्युमुखीं पडत आहेत याचा जर आपण विचार केला तर आपलें काळीज चर होऊन जाईल! अशा तऱ्हेच्या दुःखकारक कायद्यामध्यें सुधारणा करण्याकरितां आपली **राष्ट्रीय सभा** सरकारला दर वर्षीं जागें करीत आहे.



तसेंच पोलिस खात्यासंबंधानें अनेक तऱ्हेच्या सुधारणा करण्याकरितां दरवर्षीं सरकारला ही सभा सुचवीत असते. अशा रीतीनें खरोखर केवळ गरीब प्रजेची दीन स्थिति सरकारच्या कानावर घालण्याकरितांच ही **राष्ट्रीयसभा** स्थापन केलेली आहे. आजपर्यंत दोन मुंबईस, दोन कलकत्यास, दोन अलहाबादेस, दोन मद्रासेस, एक नागपूर, एक लाहोर व एक पुणें येथें, अशा एकंदर ११ बैठकी झाल्या व पुढील म्हणजे बारावी बैठक पुनः कलकत्यास होणार आहे.

आजपर्यंत ह्या सभेच्या १० बैठकी झाल्या त्यांपासून फायदा काय झाला? असे खोटसाळ प्रश्न कित्येक लोक करतात; त्यांना उत्तर इतकेंच द्यावयाचें कीं, २५ वर्षें दुसऱ्या कोणत्याही रीतीनें प्रयत्न केले असतां जो फायदा होण्याचा संभव नाहीं, तो या दहा वर्षांत झाला आहे. पूर्वीं पार्लमेंटमध्यें हिंदुस्थानचें बजेट निघालें म्हणजे स्वतः स्टेट सेक्रेटरी, अंडर सेक्रेटरी, दहा पांच पार्लमेंटचे सभासद व बाकी बाकें, अशा तऱ्हेनें जें बजेट पास होत असे, तें आतां २००।३०० सभासद हजर राहून त्या बजेटवर शंका प्रतिशंका निघून बराच खल होऊं लागला आहे; **इंडिया**सारखें मासिक पुस्तक हिंदुस्थानच्या लोकांची दैना राज्यकर्त्यांच्या नजरेस आणण्याकरितां त्यांच्याच देशांत निघूं लागलें; सर डब्ल्यू. हंटर, नामदार वेडरबर्न सारखे मोठमोठे मुत्सद्दी हिंदुस्थानचा कैवार घेऊन **राष्ट्रीय सभेनें** आरंभलेले प्रयत्न योग्य आहेत असें सिद्ध करून दाखवीत आहेत; **राष्ट्रीय सभेच्या** मागणीकडे लक्ष देऊन कायदकौन्सिलमध्यें लोकनियुक्त सभासद सरकार घेऊं लागलें आहे व त्यांस प्रश्न विचारण्याचा वगैरे अधिकार दिला आहे; अशा तऱ्हेनें निःपक्षपातानें पाहिल्यास **राष्ट्रीय सभेपासून** अनेक फायदे झाले आहेत. आज हळद प्यावी व उद्यां गोरे किती झालों हें पाहूं लागावें, अशा मताचे जे लोक आहेत त्यांस कोणत्याच संस्थेपासून फायदा होईल असें वाटणार नाहीं. मग **राष्ट्रीय सभेपासूनच** होईल असें त्यांस कसें वाटेल? असो, त्यांचें मत आपण बाजूस ठेविलें व सारासार विचार करून

पाहिजे तर या **राष्ट्रीय सभे**पासूनच आमचा फायदा होणार आहे. आपल्या पुढाऱ्यांनीं जो हा **राष्ट्रीय सभा**रूपी वृक्ष लाविला आहे तो अद्याप रोपा आहे; त्याला शरीरद्वारा मदतरूपी उदक व यथाशक्ति द्रव्यरूपी खत घालून हा चांगल्या वाढीस लावावा अशी सर्व हिंदुस्थानवासी बांधवांना—मग ते हिंदु असोत, पार्शी असोत, मुसलमान असोत किंवा पाहिजे त्या जातीचे असोत, त्या सर्वांना–प्रार्थना करून आतां यंदा पुणें येथें भरलेल्या **राष्ट्रीय सभेची** हकीकत वाचकांकरितां खालीं देतों. त्यावरून या सभेंत लोकहिताकरितां मुखत्यार कसे श्रम घेतात हें सर्वांना कळून येईल.

---

## पुण्याची राष्ट्रीय सभा.

गुदस्तां मद्रासेस ठरल्याप्रमाणें ता॰ १७रोजीं दुपारीं १ वाजतां या सभेच्या कामास सुरुवात झाली. आगोदरच राष्ट्रीय सभेविषयीं लोकांची पूज्य बुद्धि, त्यांतून इतिहासप्रसिद्ध व बाणेदार अशा पुणें शहरीं ती भरणार, तेव्हां तिचा यंदांचा समारंभ विशेष प्रेक्षणीय होणार अशी लोकांची समजूत असल्यामुळे यंदां शहरांत विशेषच गर्दी जमली होती व सर्वांच्या ठिकाणीं मोठा उत्साह दिसत होता. आमच्या वर्किंग कमिटीनेंही पुष्कळ मेहनत करून लोकांचा तो उत्साह कायम राहावा व **राष्ट्रीयसभेवर** त्यांची पूर्ण भक्ति बसावी अशाविषयीं पुष्कळ खबरदारी घेतली होती. याबद्दल त्या कमेटीचे सर्वांनींच आभार मानले पाहिजेत. प्रसिद्ध पेन्शनर इंजिनियर रा. ब. वासुदेव बापूजी कानिटकर यांच्या देखरेखीखालीं मंडपाचें काम झालें होतें, इतकें सांगितलें म्हणजे मंडपाचें वर्णन करण्याचें कारणच उरलें नाहीं. राष्ट्रीय सभेच्या गोटामध्यें मुखत्यार लोकांस राहण्याकरितां जागा, बाजारांतील दुकानांकरितां जागा, तार, पोस्ट वगैरे आफिसांकरितां व्यवस्था व राष्ट्रीय सभेच्या निरनिराळ्या हुद्देदारांचीं आफिसें, वगैरे सोई व मंडळीस हवा खाण्याकरितां तात्पुरता केलेला बगीचा, हीं



पाहतांच पाहणाराचें मन तल्लीन होऊन जात असे व येथून हालूं नये असें प्रत्येकास वाटे. इतक्या उत्तम रीतीनें एकंदर राष्ट्रीय सभेच्या गोटाची तयारी झाली होती. व्यवस्थेकरितां स्वयंसेवक बरेच जमले होते व त्यांनीं आपलें काम फार चांगल्या तऱ्हेनें चालविलें होतें.

पहिल्या दिवशीं १ वाजतां सभेच्या कामास सुरवात झाली मंडपाचे दरवाजे बारा वाजतां उघडून मुखत्यार, प्रेक्षक, वर्तमानपत्रांचे बातमीदार, कुलीन स्त्रिया व रिसेप्शन कामिटीचे सभासद, असे निरनिराळ्या दरवाजांनीं आंत नेऊन ज्यांस त्यांस योग्य ठिकाणीं हे स्वयंसेवक नेऊन बसवीत असत. १ तासांत ७-८ हजार लोक बसतील इतका मोठा मंडप अगदीं गच्च भरून गेला. बरोबर १ वाजतां नामदार **सुरेंद्रनाथ बानर्जींची** स्वारी, जानकीनाथ घोसाळ, नामदार आ. नंदाचार्लू, नाम. मेथा, प्रो. गोखले, रा. ब. भिडे, वगैरे व्यवस्थापक मंडळीसह राष्ट्रीय सभेच्या लवाजम्यानिशीं मंडपांत आले. त्यावेळीं त्यांजवरील लोकांची भक्ति, व राष्ट्रीय सभेची कळकळ हीं पूर्ण व्यक्त झालीं. असो. अशा आदरातिथ्याच्या आनंदांत सर्व मंडळी आपापल्या जागीं बसल्यावर आमच्या पुण्याचे पूर्ण अनुभवी व सार्वजनिक कृत्यांपैकीं, प्रत्येक कामांत घस सोसणारे असे सद्गृहस्थ रा. ब. विष्णु मोरेश्वर भिडे, रिसेप्शन कमेटीचे अध्यक्ष, यांचे मुखत्यार मंडळीला स्वागतपर भाषणास सुरवात झाली. रा. ब. वृद्ध असल्यामुळें त्यांनीं आपलें भाषण लिहून आणून तें प्रो. गोखले यांजकडून वाचविलें. त्याचा सारांश खालीं दिला आहे.

सभ्य जनहो, ११व्या राष्ट्रीय सभेच्या समारंभाकरितां आपण या शहरीं येऊन हें सभास्थान सुशोभित केलें आहे, म्हणून स्वागत कमिटीच्या व सर्व मुंबई इलाख्याच्या तर्फे मी आपलें स्वागत करतों. आपल्या या राष्ट्रसभेकरितां आज दहा वर्षे प्रयत्न करीत असलेल्या प्रत्येक मनुष्याला ही गोष्ट माहीत आहे कीं, आपल्या या शहरींच प्रथम या सभेचे जनरल सेक्रेटरी व आपल्यांतील कांहीं सभ्य गृहस्थ जमून त्यांनीं या सभेस सुरवात करावयाची असें ठर-

विलें व त्याप्रमाणें पाहिली बैठक याच इतिहासप्रसिद्ध शहरीं व्हावयाचें ठरलें होतें, पण कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें तो बेत रहित करून पहिला मान मुंबईशहरास द्यावा लागला. राष्ट्रीय सभेपासून हिंदुस्थानांतील सर्व जातींचे व धर्मांचे लोक एकत्र होऊन एक राष्ट्र बनावें व सर्वांना राष्ट्रीय शिक्षण मिळावें या हेतूनें ही संस्था स्थापन केली व आज १० वर्षांत तो हेतु बराच सिद्धीसही गेला आहे. निरनिराळ्या धातूंच्या पत्र्यांचें संमेलन होण्यास जसे ते बरोबर तापून घणानें ठोकावे लागतात, त्याप्रमाणेंच सर्व राष्ट्र एक होण्याकारितां ताव व घाव सोसले पाहिजेत. आतां बाहेर देशांहून ज्ञान व सुधारणा या रूपानें आपणांस हे घाव मिळताहेत, व ते आपणांस एकंदर जगापासून अलिप्त राहूं देणार नाहींत. परंतु हा बाहेरचा घाव आंतील तावाशिवाय व्यर्थ आहे. आपणांत जूट होऊन व चळवळ करून आंतून ताव आणला तरच या बाहेरील ज्ञान व सुधारणारूपी घणाच्या घावाचा उपयोग आहे; नाहींतर चीन व युरोपांतील तुर्कस्थान यांची जी स्थिति झाली तीच आपली होणार. करितां आपण सर्वांनीं आंतून चळवळ सुरू केली पाहिजे.

आज युरोपिअन राष्ट्रांची जी स्थिति आहे तशा उत्कर्षाच्या स्थितींत असून कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंत व द्वारकेपासून कटकापर्यंतच्या सर्व प्रदेशावर ज्यांनीं आपलें स्वामित्व चालविलें होतें त्या प्रतापी मराठे लोकांची हें शहर राजधानी होतें, त्यास आज बरोबर १०० वर्षें झालीं. या शंभर वर्षांत पुष्कळच घडामोडी झाल्या आहेत व त्यावेळेस आपलीं नीतिबंधनें जितपत शिथिल होतीं तितपतच आज राहिलीं असतीं तर आपल्या प्रगतीची आशाच नको होती; पण ती भीति नाहींशी झाली आहे. कारण, ज्यांची दुसऱ्याला दास्यापासून मुक्त करण्याविषयीं ख्याति आहे अशा लोकांचें आपणावर स्वामित्व आहे. व या सभेच्या ज्या सांवत्सरिक बैठकी आपण भरविल्या तें खरी या सुधारणेचेंच फल आहे, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.



६३

आपल्या या सभेस प्रतिकूल असणाऱ्या लोकांचा असा एक आक्षेप आहे कीं, हिंदुस्थान हें एक राष्ट्र नसून राष्ट्रांचा संघ आहे, व इंग्रजसरकारच्या भीतीनेंच या देशांतील लोक एकमेकांशीं मिळून आहेत. पण हें त्यांचें ह्मणणें प्रत्यक्ष अनुभवानें खोटें आहे असें म्हणण्यास बिलकूल शंका वाटत नाहीं. या हल्लींच्या आपल्या सभेंत आपण बंगाल, बहार, आसाम, पंजाब, वायव्येकडील प्रांत, गुजराथ, सिंध, महाराष्ट्र, तेलंगण, कर्नाटक, द्रविड वगैरे प्रदेशांतून स्वतः पैशाची व वेळेची झीज सोसून येथें आलों आहों व असेच दर वर्षी आपण एके ठिकाणीं जमतों, यावरून हें उघड होतें कीं, सर्व भेदभाव विसरून राष्ट्राच्या हिताकरितां झटण्यास आपण तयार आहों, व आपल्या राष्ट्राची एकी व्हावी ही सर्वांची उत्कट इच्छा आहे. आतां ही इच्छा फलद्रूप होण्यास मध्यंतरीं अनेक विघ्नें आहेत असें जरी आपणांस वाटलें तथापि अशी स्थिति येण्यास मुख्यतः जीं साधनें लागतात तीं आपणांस आज अनुकूल आहेत, व आपण सर्व एका राणीसरकारच्या ताब्यांत आहों, तेव्हां कांहीं दिवसांनी तरी आपली इच्छा फलद्रूप होईल यांत कांहीं शंका नाहीं.

त्यानंतर रा. ब. भिड्यांनीं तीं सर्व साधनें सांगून राष्ट्रीय सभेचे जे पुरस्कर्ते आहेत ते आगोदर इंडियन व मग हिंदु, मुसलमान, पार्शी, असा संकेतशब्द वापरूं लागले आहेत यावरून राष्ट्रीयत्व आमचे ठिकाणीं येऊं लागलें आहे हें चांगल्या तऱ्हेनें आपल्या निबंधांत व्यक्त करून दाखविलें. व येथें मध्यंतरीं जो बखेडा झाला तो तरी कांग्रेसवरील सर्वांची भक्ति व एका गोष्टीविषयीं एकी हीं दोन्हीं व्यक्त करून दाखविण्याच्या पुष्कळ उपयोगीं पडला, वगैरे एकराष्ट्रीयत्वाचे गुण सांगून पुढें म्हणाले कीं,

राष्ट्रीय सभेला कायमपणा यावा व तिचें काम सुरळीत चालावें म्हणून नियम करावयाचे ते, गुदस्तां ठरल्याप्रमाणें पुण्याच्या कमेटीनें तयार केले आहेत, त्यांचा योग्य विचार होईल अशी मला आशा आहे.

या शहरांतील सर्व जातींचे लोक राष्ट्रीय सभेकरितां झटते

असून फक्त मुसलमान लोक मात्र अगदीं अलिप्त राहिले आहेत ; पण हा प्रकार फक्त या शहरापुरताच आहे. व तो तरी त्यांनीं जीं कारणें दिलीं आहेत त्यांचें आम्हीं निरसन करीपर्यंतच आहे. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, राष्ट्रीय सभेंत सर्व जातींचे प्रतिनिधि येत नाहींत. ही गोष्ट खरोखर फार महत्वाची आहे. कारण, यावरून हें उघड होत आहे कीं, सर्व जातींच्या लोकांस येण्यास आम्ही मना करतों असें नाहीं; तर तेच येत नाहींत. सध्यांच्या या कांग्रेसच्या रचनेंत जी उणीव आहे ती काढून टाकण्याकरितां प्रत्येक ठिकाणच्या मुसलमानांनीं आपले पुष्कळ प्रतिनिधि पाठविले पाहिजेत. राष्ट्रीय सभेच्या पद्धतींत अजून कांहीं दोष असतील; पण तिच्या पुरस्कर्त्यांच्या हेतूबद्दल व राजनिष्ठेबद्दल वगैरे कोणासही संशय आला नाहीं. लार्ड रिपन, लार्ड डफरिन, यांसारख्या थोर मुत्सद्यांस ही सभा मान्य असून आमच्या कांहीं मुसलमान बंधूंनीं तीस बिनाकारण भलतेच दोष द्यावे हें फार वाईट आहे. ( यानंतर मुसलमान लोकांना उपदेशपर थोडेंसें भाषण करून व पुणेंकरांची थोडीशी स्तुति करून म्हणाले कीं, ) यंदां विशेष समाधानाची गोष्ट म्हटली म्हणजे अध्यक्षांची निवड ही होय. जुन्या चालीच्या व नव्या चालीच्या हिंदूंच्या अंगीं जे गुण असणें अवश्य ते सर्व त्यांचे ठिकाणीं आहेत; त्यांना कामाची हौस आहे; कांग्रेसचे ते पूर्वींपासून भक्त आहेत व कांग्रेसकरितां त्यांनीं स्वतः झीज सोसून येथें व इंग्लंडांत बरीच मेहनत केली आहे. अशा पुरुषाच्या अध्यक्षतेखालीं यंदाची बैठक यशस्वी होणारच. ( यानंतर आपल्या म्हातारवयांत माझ्या जीविताचें सार्थक झालें असें सांगून, रीतीप्रमाणें अध्यक्षांची निवडणूक करावी असें सुचवून निबंध पूर्ण केला. )

नंतर मद्रासचे पी. आनंदाचार्लू यांनीं चटकदार भाषण करून ना. सुरेंद्रनाथ बानर्जी यांस अध्यक्ष नेमावें अशी सूचना केली, व त्या सूचनेस अनुकूल अशीं डा. बहादुरजी व मि. मुधोळकर यांचीं भाषणें झाल्यावर अध्यक्षांची स्वारी, टाळ्यांच्या गजरांत, नेमलेल्या



स्थानीं विराजमान झाली व मंडळी स्वस्थ झाल्यानंतर त्यांनीं आपल्या भाषणास सुरवात केली. ते म्हणाले: —

सद्गृहस्थहो— आपण यंदांच्या कांग्रेसच्या अध्यक्षाचा जो मला मान दिलांत, यापेक्षां जास्त सन्मान अथवा अधिक भरंवशाचें काम किंवा एखादें श्रेष्ठपद दुसरें असेल असें मला वाटत नाहीं. ( या ठिकाणीं अध्यक्षाच्या अंगीं कसे गुण असावे लागतात तें सांगून, आपणा सर्वांची कांग्रेस ही देवताच बनली आहे अशा आशयाचा इंग्रजी पत्रांत वाचलेला मजकूर त्यांनीं सांगितला. व पुण्याच्या कांग्रेसबद्दल ते म्हणाले कीं, आपली सर्वांची कांग्रेसवर पूर्ण भक्ति आहे व कान्फरन्सच्या संबंधानें न्या. मू. रानडे यांनीं दुही मोडण्यासाठीं आपला उद्देश बाजूला ठेविला याबद्दल कांग्रेसवर त्यांचे उपकार आहेत असें सांगून ते म्हणाले कीं, ) आज अकरा वर्षें आपण कांग्रेस भरवीत आलों, पण तिच्या रचनेचे नियम अद्यापि ठरविले नाहींत, ते यंदां ठरविण्याचा विचार आहे. आपल्यामध्यें बाकीच्या गोष्टींत जरी मतभेद असले तरी आपण कांग्रेसच्या कामांत अगदीं एक दिलानें काम करतों हें संमतिवयाच्या कायद्याच्या वेळीं उघड झालें आहे. त्यावेळेस कांग्रेसचे दोन मुख्य पुढारी सर रोमेशचंद्र-मित्र व मि. ह्यूम हे निरनिराळ्या बाजूत असून व जिकडे तिकडे भयंकर ज्वाला पेटली असून कांग्रेसमध्यें त्यापासून कांहींएक अडथळा आला नाहीं. त्यावेळेस आपण एक झालों व राजकीय गोष्टींचा आपण एक मतानें योग्य विचार करावयाचा तोच केला. व ज्या एखाद्या राजकीय गोष्टींत सुद्धां थोडासा मतभेद असेल ती गोष्ट विचाराकरितां पुढें आणूं नये, असें आपण १८८७ सालीं ठरविलें आहे.

साधारण एखादी संस्था बाल्यावस्थेंत असते त्यावेळेस तिला अनेक अडचणी असतात, पण प्रत्येक अडचणीच्या वेळेस तिचे पुरस्कर्ते एकत्र जमून विशेष एकीनें ती अडचण पार पाडतात. पण ती बाल्यावस्था जाऊन उत्कर्षसूर्य मध्यान्हीं आला व बाजूचीं संकटें

कमी होत गेलीं ह्मणजे आपसांत तंटे माजून त्या संस्थेस इतरती काळा लागण्याचा समय फार असतो. तशी वेळ अद्याप आपल्या कांग्रेसला आली नाहीं. आपले शत्रु अद्याप आपला उपहास करीत आहेत, अजून आपल्याला पुष्कळच पुढें जावयाचें आहे. ब्रिटिश लोकांइतकी आपणांस स्वतंत्रता व हक्क मिळाले ह्मणजे सर टी. माधवराव यांनीं मागें म्हटल्याप्रमाणें कांग्रेस ही ब्रिटिश राज्यपद्धतीचा मुकुट दिसेल यांत शंका नाहीं.

कांग्रेसच्या रचनेचे नियम करण्याविषयीं एक ठराव आपण १८८७ सालच्या कांग्रेसमध्यें केला होता व त्यासंबंधानें एक कमिटी नेमून त्या कमिटीचा रिपोर्ट ता. ३० रोजीं त्याच कांग्रेसमध्यें आला व त्यावेळेस हे ठराव निरनिराळ्या स्टॅंडिंग कांग्रेस कमिट्यांकडे पाठवून त्यांजकडून पुढील कांग्रेसच्या वेळीं रिपोर्ट मागवावे असें ठरलें होतें. पण तशा रीतीनें पुढच्या म्हणजे अलाहाबाद कांग्रेसच्या वेळीं ते रिपोर्ट वाचले नाहींत. पुनः गुदस्तांच्या मद्रास कांग्रेसच्या वेळीं हा विषय विचाराकरितां पुढें येऊन आपण तें काम पुण्याच्या मंडळीकडे सोंपविलें व तिनें कांहीं नियम करून ते निरनिराळ्या स्टॅन्डिंग कमिट्यांकडे पाठविले आहेत. कांग्रेसची रचना कायद्याच्या तत्वांवर होऊन जर ती नीट रीतीनें चालेल तर सरकारासही तिचें ह्मणणें कबूल करणें भाग पडेल. ज्यांनीं ही कांग्रेस स्थापन केली त्यांच्या स्वप्नीं नव्हतें इतकें यश हल्लीं कांग्रेसला मिळालें आहे. लार्ड मेकाले यांनीं जो आनंदाचा, जो महोत्सवाचा दिवस पुढें खास येईल म्हणून भाकीत करून ठेविलें होतें, तो दिवस आपल्या कांग्रेसमुळें आला आहे. सध्यांच्या स्थितींतला एकही प्रश्न कांग्रेसनें वगळला नाहीं. न्यायखातें व वसुलाची खातें वेगळालीं करण्याबद्दल कांग्रेसनें जी सरकारला विनंति केली आहे ती फार चांगली आहे असें लार्ड डफरीनसाहेबांनींही कबूल केलें आहे. अबकारीचा प्रश्न, पोलिस सुधारणा, सिव्हिल सर्व्हिसची वयाची यत्ता व कायदे कौन्सिलांची सुधारणा, या गोष्टी कांग्रेसमुळेंच घडून आ



ल्या आहेत.

( इतकें सांगितल्यानंतर, सन १८९२ सालीं कायदे कौन्सिलें सुधारण्याचा जो कायदा केला त्यापासून आपल्याला विशेषसा उपयोग होत नाहीं; त्यांत सरकारची बाजू जास्त असते, रयतेच्या तर्फे आणखी जास्त सभासद पाहिजेत, अशाबद्दलचीं योग्य कारणें देऊन तीं सरकारास कळवून पुनः त्या कायद्याच्या पहिल्या कलमांत दुरुस्ती करण्याविषयीं सरकारास विनंति करावी, असें त्यांनीं सुचविलें.)

कौन्सिलांत प्रश्न विचारण्याचा जो त्या कायद्यानें अधिकार दिला आहे तो कमी करण्याचें घाटत आहे अशाबद्दल जी बातमी आहे तीविषयीं ते म्हणाले कीं, ही बातमी बाहेर पडतांच चोहोंकडून ओरड सुरू झाली. कारण, मुळीं प्रश्न विचारण्याला संधिच जर फार थोडी मिळेल, तर लोकांचे प्रश्न तुंबून राहणार व ४-५ महिन्यांनीं जेव्हां कौन्सिल भरेल तेव्हां ते प्रश्न बाहेर येणार. या हक्काचा लोक चांगल्या तऱ्हेनें उपयोग करीत आहेत अशाबद्दल लंडन टाईम्स, सर चार्लस ईलियट, यांचीं सर्टिफिकिटें आहेत व हौस आफ कामन्स, हौस आफ लार्ड्स, या सभांतूनही प्रश्नांस उत्तर मिळाल्यावर पुनः प्रश्न विचारतात, मोठमोठीं भाषणें करतात, तर आपल्या या कौन्सिलांतून हा प्रश्न विचारण्याचा अधिकार वास्तविक जास्त विस्तृत असा केला पाहिजे व सरकार आणि रयत यांचा प्रेमभाव वाढण्यास तो एक उत्तम उपायच होणार आहे.

आतां कदाचित् कोणी असें ह्मणतील कीं, नुकताच कौन्सिलचा कायदा केला आहे, तेव्हां इतक्यांतच तो दुरुस्त करणें बरोबर नाहीं. पण या म्हणण्यास उत्तर येवढेंच कीं, कोणत्याही गोष्टीस आपण सुधारणा करा म्हणतांक्षणींच सरकार करीत नाहीं. याच कौन्सिलच्या सुधारणेकरितां आपण १८८५ सालापासून सारखी ओरड केली, तेव्हां ती आपली ओरड सरकारानें १८९२ सालीं मनांत आणली. तसेंच या कामींही आपण एव्हांपासून सरकारास दर वर्षी

विनंति करूं तर सरकारचें मन कांहीं दिवसांनी तरी तिकडे जाईल

हल्लींच्या कौन्सिल्स ॲक्टमध्यें बजेटवर वादविवाद करण्याच लोकनियुक्त सभासदांस परवानगी आहे, पण त्याबद्दल एखादी सूचन मात्र पुढें आणण्याचा अधिकार दिला नाहीं. वास्तविक हा अधिकार देण्यास कांहीं हरकत नाहीं. सीलोनमध्यें गव्हर्नराच्या कौन्सिलमधील लोकनियुक्त सभासदांस गव्हर्नरसाहेबांची आगोदर परवानगी घेऊन बजेटसंबंधानें कोणताही ठराव कौन्सिलपुढें आणण्याचा पूर्ण हक्क आहे. आपल्यास कोणत्याही गोष्टींत कायदेशीर चळवळ करण्यास इंग्रज लोकांनीं शिकविलें आहे, तेव्हां या बाबतींतही दुसऱ्या देशांप्रमाणें आपल्याला अधिकार मिळण्याविषयीं आपण चळवळ करावी.

या कौन्सिलमध्यें अधिकारी यांचे मताचा रोंख पाहून मत देण्याची जी पद्धत आहे ती फार वाईट आहे. तसेंच सुप्रीम कौन्सिलपुढें एखादें बिल आणावयाचें असल्यास प्रथम स्टेटसेक्रेटरींची परवानगी घ्यावी लागते व अर्थात्च अशा बिलावर वादविवाद होणें म्हणजे तो निवळ फार्सच आहे, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. वरिष्ठांचा हुकूम मान्य करण्याचा प्रकार कापडावर जकात बसविली त्याच वेळेस आपल्या पूर्ण अनुभवास आला आहे. कौन्सिलरांनी आपलें स्वतःचें मत न देतां अधिकाऱ्याचे मताचा रोंख पाहून मत दिलें पाहिजे असा व्हाइसराय साहेबांनीं गुदस्तां कित्ता घालून दिला प्रसिद्ध एडमंड बर्क हे कान्सर्वेटिव असूनसुद्धां त्यांनीं या तत्वाचा पूर्ण निषेध केला होता. तसेंच सर चार्लस ईलियट यांनीं सन १८९३ सालीं असें बोलून दाखविलें होतें कीं, सभासद लोकनियुक्त असो अगर सरकारानें नेमलेला असो, कोणत्याही प्रकरणांत त्यानें आपलें स्वतःचें मत देणें योग्य आहे. तेव्हां आतां हें ईलियट साहेबांचें मत खरें किंवा व्हाइसराय साहेबांनीं घालून दिलेला कित्ता खरा?

यावर पुनः स्टेट सेक्रेटरी आहेतच! ते म्हणणार कीं, हुकूम करण्याचा अधिकार आमचा आहे. ड्यूक आफ आर्गाईल यांची त



अशी समजूत असे कीं, हिंदुस्थान सरकारानें फक्त हुकमाची अंमलबजावणी करावी व स्टेट सेक्रेटरींनीं हुकूम द्यावा. तिकडच्या सगळ्याच लोकांस हें म्हणणें पसंत नाहीं. पुष्कळ लोक याच्या उलट आहेत. सर वर्नस पिकॉक यांनीं तर असें बोलून दाखविलें आहे कीं, ज्याला स्वतःच्या अब्रूची चाड नसेल तोच अशा रीतीनें परावलंबी राहील.

परलोकवासी जान ब्राईटसाहेब नेहमीं म्हणत कीं, ज्या राज्यांतील तिजोरीची स्थिति चांगली त्यांतील व्यवस्था उत्तम; व ज्यांतील तिजोरीची ओढाताण त्या राज्यांतील लोक कठिन अवस्थेंत आहेत असें समजावें. आज आपल्या तिजोरीकडे पाहिलें तर लष्करी खर्च व हुंडणावळ या दोन कारणांनीं तिची ओढाताण झालेली आहे. आपली ब्रिटिश कांग्रेस कमिटी व सर विल्यम हारकोर्ट यांनीं या लष्करी खर्चामुळें आमच्या तिजोरीवर होणारा अन्याय चांगल्या रीतीनें उघड करून दाखविला आहे. सन १८५७ सालच्या बंडाच्या वेळीं २,४०,००० लष्कर होतें, त्याचा खर्च फक्त ११ कोट रु. झाला होता. पुढें ७ वर्षांनीं लष्कर कमी केलें, पण खर्च १४ कोट रु. झाला. नंतर १८८४ सालीं १,८९,००० लष्करी लोकांस १७ कोट रु खर्च झाले व गेल्या सालीं तर तो खर्च २० कोटींला पोंचला. व याशिवाय हुंडणावळ ती निराळीच. अशा या दोन रस्त्यांनीं तिजोरीचे फार हाल झाले आहेत. आपल्या तिजोरीची खरी स्थिति कशी आहे ह्मणून जर मला कोणीं विचारिलें तर मी दोनच शब्दांत खरी स्थिति सांगेन व ते दोन शब्द हे कीं, 'तूट' व 'कर्ज.' १८३४ पासून गेल्या सालपर्यंत एकंदर जमाखर्चांचे आंकडे पाहिले तर, एकंदर ६० वर्षांत ३४ वर्षे ८३ कोट रुपयांची तूट आली व बाकीच्या २६ वर्षांत मिळून ४२ कोट रु. शिल्लक राहिले. सरासरीनें ४१ कोट रुपयांची तूट राहिली. ह्मणजे दर वर्षास ६९ लक्षांची तूट आली. इतक्या मुदतींत २६ कोट रु. कर्ज होतें तें २१० कोट झालें! किती शोचनीय स्थिति ही!! अशा स्थितींत

कर्ज फेडण्याकरितां काटकसर करणें सोडून सरकारचें खर्चाचें प्रमाण वाढत्या प्रमाणावर आहे, हें पाहिलें ह्मणजे तिजोरीची कींव येणें साहजिकच आहे.

( यानंतर चित्रळ प्रकरणांत केलेला अन्याय, व त्यापासून तिजोरीवर होणारा भयंकर परिणाम हीं चांगल्या तऱ्हेनें व्यक्त करून अध्यक्षसाहेब होमचार्जेसकडे वळले, व ह्मणाले कीं, )

हा खर्च दिवसेंदिवस फारच वाढत चालला आहे. मागील १० वर्षांत शेंकडा ३० या प्रमाणानें तो वाढला आहे. हा खर्च १८८२ सालीं १,७३,६९,००० रुपये होता, तो पुढें १० वर्षांनीं २,२९,११,००० रुपये झाला. कलोनिअल आफिस बांधण्याकरितां विलायतसरकारास काय तो १,००,००० पौंड खर्च आला, पण तेथेंच आमच्या सरकारास इंडिया आफिस बांधण्यास खर्च किती? तर ५,००,००० पौंड! याचें कारण कोणी सांगतील काय? तसेंच विलायतसरकारास कलोनिअल आफिसचे खर्चाकरितां काय ते ४१,००० पौंड द्यावे लागतात व आमच्या इंडिया आफिसबद्दल आमचें सरकार वर्षास २,३०,००० पौंड खर्च करतात! हा जो उत्तरोत्तर खर्च वाढत चालला आहे याचा योग्य विचार होईल तरच आपली धडगत लागणार आहे.

( पुढें हिंदुस्थानच्या दारिद्र्याबद्दल मि. दादाभाई नौरोजींनीं काढलेले आंकडे सांगून, जास्त कर बसवितां येत नाहीं ह्मणून अप्रत्यक्ष रीतीनें बसविलेला कर ह्मणजे कापडावरील जकात व हुंडणावळीचा भाव वाढल्यामुळें कांपेन्सेशन देण्यापासून आपलें होणारें नुकसान हीं चांगलीं व्यक्त करून दाखविलीं व ह्मणाले कीं, )

आपले सर डब्ल्यू. वेडरबर्न साहेब व ब्रिटिश कांग्रेस कमिटी यांच्या उद्योगामुळें सिव्हिल व मिलिटरी खर्चाची चौकशी करण्याकरितां विलायतेंत एक रायल कमिशन बसलें आहे. अशा वेळेस आपल्या देशांतील प्रत्येक सभेनें ह्याबद्दल एकेक अर्ज पाठवून दिला पाहिजे. ह्मणजे कदाचित् ह्या खर्चाचा योग्य वाटा इंग्लंडलाही भरावा



लागेल.

मोठ्या हुद्याच्या जाग्यांवर युरोपियन लोकच सरकार नेमतें, त्यांना पगार पुष्कळ व शिवाय कांपेनसेशन; यामुळें आपलें पुष्कळ नुकसान होत आहे. करितां सरकारानें त्या जागांपैकीं बऱ्याच जागा नेटिव लोकांस दिल्या असतां ते कमी पगारावर मिळूं शकतील व त्यायोगानें तिजोरीचीही स्थिति सुधारेल.

हिंदु मुसलमानांपैकीं फक्त खालच्या प्रतीच्या लोकांत जे आलीकडे हिंदुस्थानांत दंगे झाले त्यांमुळें आपल्या राजकीय सुधारणेस बराच मोठा धक्का बसला.

समकालीन परीक्षेच्या संबधानें मुसलमान व शीख लोक मागें पडतील असा जो एक आक्षेप पुढें आणला जात असतो तो अगदीं खोटा आहे. कारण, १८९५ सालीं मि. शेख अशगर अल्ली हे एकटेच गृहस्थ या परीक्षेंत पास झाले; तुह्मां सर्वांच्या तर्फेनें मी त्यांचें अभिनंदन करतों. तसेंच १८९४ सालीं एक शीख गृहस्थही पास झाले आहेत. यावरून वरील आक्षेप अगदीं खोटा आहे असें आपणही कबूल कराल.

इंग्रज लोक स्वातंत्र्यप्रिय असून तें दुसऱ्यासही आपल्या बरोबरीनें वागविण्यास तयार आहेत; पण मोठमोठ्या अधिकारांच्या जागा व फारेस्ट आणि पोलिस खात्यांतील प्रवेश परीक्षांस ते आह्मांस बसूं देत नाहींत याचें कारण काय असेल तें असो. वर्णभिन्नता हा काय तो आमचा अपराध!

आपल्या लोकांना लष्करांत मोठमोठे अधिकार मिळत नाहींत याबद्दल मला खेद वाटतो. एखादा नेटिव कितीही हुषार असो, कितीही शूर असो व कितीही पराक्रमी असो, त्याला ब्रिटिश फौजेंत मेजर अगर रिसालदार यापेक्षां मोठ्या अधिकाराची जागा मिळतच नाहीं. हिंदुस्थानांत एक मिलिटरी कॉलेज असावें अशाबद्दल आपण दर वर्षीं सरकाराला विनंति करतों. ड्यूक आफ कॅनाटसारख्यांचेंही या कालेजला अनुकूल मत आहे. असें असून सरकार अद्याप ति-

कडे लक्षच देत नाहीं. मुसलमान लोकांचें राज्य आमच्या देशांत सारखें २०० वर्षें चाललें याला मुख्य कारण हेंच कीं, त्यांनीं नेटिव लोकांस मोठमोठ्या हुद्यांच्या जागा दिल्या, व त्यामुळेंच हिंदुलोक मुसलमान राजांचें कल्याण चिंतूं लागले. तद्वत् सरकारला जर हिंदुस्थानांत आपलें कायमचें राज्य राहावें अशी इच्छा असेल तर त्यांनीं भेदभाव विसरून योग्य मनुष्यास मोठमोठ्या जागा दिल्या पाहिजेत.

न्याय व अंमलबजावणी हीं दोन्हीं कामें करणारे निरनिराळे अधिकारी असावे अशाबद्दल आजपर्यंत आपण अनेक वेळां ऊहापोह केला; पण सरकारानें अद्याप तिकडे लक्ष दिलें नाहीं. यासंबंधानें लार्ड डफरीन, लार्ड क्रास, लार्ड किंबर्ले, यांच्यासारख्या मोठमोठ्या अधिकाऱ्यांनीं आपले अनुकूल अभिप्राय दिले आहेत. तसेंच सर रोमेशचंद्र दत्त यांनीं हें काम हल्लींपेक्षां खर्च न वाढवितां कसें करतां येईल तें सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे. तेव्हां माझी सर्वांना येवढीच सूचना आहे कीं, प्रत्येक प्रांतांतील जबाबदार संस्थेनें, हीं दोन्हीं कामें एकाच अधिकाऱ्याकडे असल्यामुळें होणाऱ्या अन्यायाचें एक पुस्तक प्रसिद्ध करावें, ह्मणजे कदाचित् सरकार लोकमताला मान देईल.

हल्लीं सरकारच्या पुढें दोन बिलें आलेलीं आहेत- एक जूरीचें व दुसरें दलालांचें. दलाली बंद करण्याबद्दल जें बिल पुढें आलें आहे त्यांत जीं कलमें आहेत त्यांतील कांहीं कलमांमुळें वकील लोकांचें स्वातंत्र्य नष्ट होणार व हल्लीं वकील लोक सर्व कामांत पुढारी असल्यामुळें त्यांच्या स्वातंत्र्यास धक्का बसला असें होईल. तसेंच जूरर लोकांना विशेष मुद्याच्या गोष्टींवर अभिप्राय विचारण्याचा हक्क जज्जांस द्यावा, असें जूरीबिलमध्यें आहे; पण या अधिकाराचा बऱ्याच ठिकाणीं दुरुपयोग होईल अशी भीति आहे. यासंबंधानें कलकत्ता व मुंबई हायकोर्ट जज्जांचीं मतें प्रतिकूल आहेत. तसेंच बंगाळच्या लेफ्टेनंट गव्हर्नराचेंही असेंच ह्मणणें आहे कीं, जज्ज चांगला असेल तर हा अधिकार देण्याचें कारणच नाहीं. जूरीचे अधिकार आहेत



यांपेक्षां वाढवावे, अशाबद्दल आपण सरकारास सूचना देत आहोंत. त्याप्रमाणें बंगाळ सरकारानें सहा प्रांतांत ही पद्धति सुरू केली आहे, सबब आपण त्यांचे आभार मानले पाहिजेत.

(यानंतर शिक्षणासंबंधानें दुसऱ्या देशांत प्रत्येक माणशीं होणारा खर्च व हिंदुस्थानांत होणारा खर्च दाखवून, सरकारानें आह्मांस सर्व प्रकारचें शिक्षण द्यावें, असें सांगितलें. नंतर ह्मणाले कीं, )

असे अनेक तऱ्हेचे प्रश्न विचाराकरितां आपणांस पुढें घ्यावयाचे आहेत. आज दहा वर्षें आपण आपलें ह्मणणें सरकारच्या कानावर घालीत आहोंत त्याचा कांहीं तरी उपयोग व्हावा, याकरितां आपण विलायतेपर्यंत मजल मारली पाहिजे. तेथें मि. दादाभाई, हर्बर्ट पाल, मि. केन, बानर्जी, वगैरे आपल्या देशाचे मित्र पार्लमेंटमध्यें निवडून आले नाहींत. मि. भावनगरी हे कान्सरवेटिव लोकांकडून निवडून आले आहेत. त्यांना आमचीं मतें कळून त्यांनीं त्यासंबंधानें योग्य विचार करून त्यांचें मत आमच्या पक्षास मिळो, असें मी मनापासून इच्छितों. विलायतेंतील लिबरल पक्षानें, सन १८९० सालीं कांग्रेसचे डेलिगेट तिकडे गेले तेव्हां त्यांस पुष्कळ मदत केली आहे. ९२ सालीं मि. पाल साहेबांनीं समकालीन परीक्षेचा पुढें आणलेला ठराव लिबरल पक्षानेंच पास केला. व तो ठराव लिबरल पक्षाच्याच सेक्रेटरीनें गुंडाळून ठेवला. जूरीचा जाहिरनामा काढून घेतला तो लिबरल पक्षानेंच, व हिंदुस्थानचें हित व्हावें ह्मणून आयात कापसाचे मालावर जकात बसविली तीसुद्धां याच पक्षानें. तेव्हां आपणांस विलायतेंतील कोणत्या तरी पक्षास मिळालेंच पाहिजे, पण एक गोष्ट मुख्यत्वेंकरून ध्यानांत ठेविली पाहिजे, ती ही कीं, आपणा कांग्रेसवाल्यांस तरी ब्रिटिशसरकारचें राज्य चिरस्थायी व्हावें व लोकांचें कल्याण व्हावें याकरितां फक्त दोष काढून टाकण्याकरितां मात्र आपल्याला प्रयत्न करावयाचे आहेत. हिंदुस्थान सरकारानें आपल्या कांग्रेसचे हक्क जितके लवकर कबूल केले, इतके दुसऱ्या सरकारानें लवकर कबूल केले नसते. शिवाय ब्रिटिश अमलापासून सुधारणेचीं तत्वें आपल्याला कळूं ला-

गलीं आहेत. याकरितां आपण व आंग्लो इंडियन लोक या दोघांनीं ही एक दिलानें हातांत हात घालून सरकारचे दोष तेवढे काढून टाकून सरकार व प्रजा या उभयतांत एकी व प्रेमभाव वाढेल अशा तऱ्हेचे प्रयत्न केले पाहिजेत. जर त्यांच्या आपल्यांत फाटाफूट राहिली तर दोघांचेंही अहितच होणार आहे.

ज्या इंग्लंडच्या सत्तेखालीं आज हिंदुस्थानचे लोक सुधारणाप्रिय होत चालले आहेत त्या इंग्लिश लोकांचा अमल येथें चिरकाल राहावा, स्वातंत्र्याचे जे लोक भोक्ते आहेत अशा लोकांचें राज्य आपल्या या देशावर आहे, तेव्हां त्यांचें स्वामित्व आपल्यावर राहून आपल्या हक्कांचें आपणांस स्वातंत्र्य मिळावें, अशी सर्वांची इच्छा आहे.

( याप्रमाणें इंग्रजी राज्याचें वैभव गाऊन व अखेरीस त्यांचें राज्य आपल्या देशावर राहिल्यापासून आपलें पुष्कळ हित झालें आहे व पुढें होईल अशी आशा दाखवून अध्यक्षांनीं आपलें भाषण संपविलें व टाळ्यांच्या गजरांत आपल्या जागीं बसले.)

( नंतर कांग्रेसचे जाईंट जनरल सेक्रेटरी मि. घोसाळ यांचे सूचनेवरून सुमारें १९० गृहस्थांची एक सबजेक्ट कमेटी नेमून पहिल्या दिवसाचें काम पुरें झालें. )

---

## दिवस दुसरा.

### शनिवार.

सभेच्या कामास ११ वाजतां सुरवात झाली. प्रथम अध्यक्षांनीं दुर्भंगाचे महाराज व रामनाथचे राजे यांच्या अभिनंदनपर व राजा रामपालसिंह यांची, आपल्या न येण्याचे कारणाची अशा तीन तारा वाचून दाखविल्या व मग कांग्रेसच्या रचनेच्या संबंधानें जे नियम पुण्याच्या कमेटीनें केले ते त्यांनीं सर्व कांग्रेस कमिट्यांकडे पाठवावे व त्यांनीं पुढील डिसेंबरच्या आगोदर तीन महिने आपापलीं मतें जनरल सेक्रेटरीकडे पाठवावीं असा पहिला ठराव मि. घोसाळ यांनीं पुढें



आणला व मि. जयसीराम यांनीं त्यास अनुमोदन दिलें.

**दुसरा ठराव.**—विलायतेंत हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेच्या खर्चाची चौकशी करण्याकरितां जें कमिशन बसलें आहे त्याची चौकशी प्रसिद्धपणें व्हावी व त्या कमिशनपुढें सरकारी नौकर व आंग्लो इंडियन यांशिवाय इतर लोकांच्या साक्षी झाल्या पाहिजेत; हा ठराव बाबू वैकुंठनाथसेन यांनीं सभेपुढें मांडतांना, ही चौकशी प्रसिद्धपणें कां झाली पाहिजे याचें कारण सांगून हिंदुस्थान सरकारानेंही हल्लींच्या या कमिशनच्या कार्यक्रमास मान न देतां कांग्रेसनें सुचविलेली दिशा पत्करून कमिशननें काम चालवावें असें सांगितलें. यांच्या सूचनेस मद्रासचे आन. जंबुलिंगम मुदलियार यांनीं अनुमोदन देतांना सांगितलें कीं, आह्मीं मागितलें एक व मिळालें भलतेंच, असा प्रकार या बाबतींत झाला आहे. हिंदुस्थानाबद्दल विलायतेंत जो खर्च होतो त्यांत पुष्कळ काटकसर करण्यास जागा आहे व निरनिराळ्या लढायांमुळें हिंदुस्थानच्या पैशाचा जो चक्काचूर उडतो त्याची चौकशी झाली पाहिजे. यांचें भाषण झाल्यावर या सूचनेस पुष्टीकरण ह्मणून पंडित मदनमोहन मालवीय यांनीं मोठें जोरदार भाषण केलें. त्यांनीं सांगितलें कीं, सन १८५८ सालीं राणीसरकारांनीं प्रत्यक्ष आपल्या पदरांत आह्मांस घेतलें, त्यावेळीं आह्मांस मोठी आशा वाटत होती कीं, कंपनीच्या अमलांत एखादे वेळेस जो जुलमी प्रकार होत असे तो आतां बंद होईल. पण अनुभव त्याच्या अगदीं उलट आहे. कंपनीच्या कारकीर्दींत दर वीस वर्षांनीं एकदां तपासणी तरी करीत असत, तीही आतां होत नाहीं. आमच्याशीं इंग्लंडचें वर्तन अन्यायाचें होत आहे असें सांगितलें नंतर हा ठराव सर्वानुमतें पास झाला.

**तिसरा ठराव.**— लष्करी खर्च, हिंदुस्थानाबद्दल विलायतेस होणारा खर्च व मुलकी खात्यांतून होणारा खर्च यांत काटकसर केल्याशिवाय हिंदुस्थानच्या तिजोरीची नीट व्यवस्था लागणार नाहीं; तिजोरीची दुर्दशा होण्यास हुंडणावळीपेक्षां लष्करी खर्चाचें कारण विशेष आहे, असें जें इंडियन पार्लमेंटरी कमिटीचें मत आहे तेंच बरो-

बेर आहे. हा ठराव मि. वाच्छा यांनीं सभेपुढें मांडला. ते ह्मणाले कीं, हिंदुस्थान सरकारचे फडणवीस सर वेस्टलंड यांनीं या बाबतींत हुंडणावळीचें जें कारण दाखविलें आहे तें निव्वळ खोटें आहे. पूर्वीचे फडणवीस सर आक्लंड कालव्हिन यांनीं व विलायतेंतील पत्रांनींही सर वेस्टलंड यांचें म्हणणें बरोबर नाहीं असें सप्रमाण सिद्ध केलें आहे. लष्करी खर्चांतील इफेक्टिव व नानइफेक्टिव या दोन्ही सदरांत फार वाढता खर्च आहे. सरकार आपणास नेहमीं ह्मणतें कीं, तुह्मी नुसती टीका मात्र करता, पण सुधारणा कशी करावी तें तपशीलवार आम्हांस सांगत नाहीं. आह्मीं जमाखर्चाचे बाबतींत तपशीलवार माहिती मागितली असतां सरकाराकडून आम्हांस ती मिळत नाहीं; पण आमच्याजवळ मात्र सरकार तपशीलवार माहिती मागतें, हा न्याय कसा आहे पहा. या ठरावास मद्रासचे मि. एम. के. नायर यांनीं अनुमोदन देतांना सांगितलें कीं, सध्यां जें गोरें सैन्य वाढत चाललें आहे त्याची अवश्यकता नसून तें फक्त पोषाखी आहे. गोऱ्या सैन्यापेक्षां नेटिव सैन्यच जास्त काम करतें व ह्मणून नेटिव लोकांसच मोठमोठ्या हुद्याच्या जागा द्याव्या ह्मणजे खर्च कमी होईल व सैन्यास लागणारें सामान विलायती न घेतां येथें उत्पन्न होणारें घ्यावें म्हणजे खर्चांत पुष्कळ काटकसर होईल, असें सांगितलें. नंतर या ठरावास डा. बहादुरजी यांनीं पुष्टीकरणार्थ भाषण करुन हा ठराव सर्वानुमतें पास झाला.

**चवथा ठराव.**—जुडिशियल व एक्झिक्युटिव्ह हे दोन्ही अधिकार एका व्यक्तीमध्यें असूं नयेत अशाबद्दल स्टेटसेक्रेटरी व हिंदुस्थानसरकार यांस ही सभा विनंति करीत आहे. हा ठराव मि. मनमोहन घोस यांनीं सभेपुढें आणिला. त्यावेळेस ते ह्मणाले कीं, ही जी आपण विनंति करीत आहोंत ही कांहीं नवी नव्हे; तर आपल्या या राष्ट्रीय सभेच्या उत्पत्तीची कल्पनाही नव्हती अशा वेळेस, ह्मणजे आज बरोबर १०० वर्षें झालीं, लार्ड कार्नवालिस साहेबांनींच हे दोन्ही अधिकार निरनिराळे असावे असें बोलून दाखविलें होतें. पुढें



हिंदुस्थानांतील बंडाळी मोडल्यावर १८६१ सालीं पोलिस आक्टाचे वाटाघाटींचे वेळींही असेंच ठरलें. इतकेंच नव्हे, तर लार्ड क्रास व लार्ड किंबर्ले यांनींही पार्लमेंटपुढें हेंच बोलून दाखविलें. असें असून सरकार अद्याप ती गोष्ट अमलांत आणीत नाहीं. मोठी अडचण खर्चाची दाखविली जाते, पण ती खोटी आहे. खरी अडचण ही आहे कीं, सरकारी अधिकारीवर्गास यापासून आपलें वजन कमी होईल अशी भीति वाटते व ह्मणून आपल्या हाताखालील कामदारांचा बोज कमी होऊं नये याकरितां अधिकारीवर्ग या सूचनेस प्रतिकूल आहे. पण ही त्यांची चूक आहे. इंग्लंडांतील लोक अशा तऱ्हेनें या अडचणीस कधींही कबूल होणार नाहींत करितां आपण यासंबंधानें सारखे प्रयत्न चालविले पाहिजेत, ह्मणजे कधींतरी यश येईल. या ठरावास नामदार चिमणलाल सेटलवाड यांनीं अनुमोदन देतांना सांगितलें कीं, चित्रळसारख्या प्रकरणांत सरकार पैशाचा चक्काचूर उडवीत आहे आणि अशा लोकांच्या गैरसोई दूर करण्याच्या कामीं सरकार ओढगस्तपणा दाखवितें. नंतर आणखी एक दोन भाषणें होऊन हा ठराव पास झाला.

**( अर्धा तास सुटी. )**

**पांचवा ठराव.**—जूरीचे हक्क काढून घेण्याचे संबंधानें जो हल्लीं सरकार विचार करात आहे त्या बाबतींत, ते हक्क काढून घेऊं नयेत ह्मणून सरकारास विनंति करण्याचा होता. हा ठराव उमेशचंद्र बानर्जी यांनीं सभेपुढें मांडिला. ते ह्मणाले कीं, सर अलेक्झांडर मिलर साहेबांनीं हें जूरीचें बिल व्हाइसरायांच्या कौन्सिलपुढें आणलें आहे त्यांत, हल्लीं जूरर्स व जज्ज यांच्यामध्यें मतभेद पडला तर हायकोर्टाकडे निकालाकरितां जज्जसाहेबांस धांव मारावी लागते. ती चुकविण्याकरितां मतभेद कोणत्या बाबतींत झाला आहे अशाबद्दल प्रश्न करण्याचा अधिकार जज्जास द्यावा, असें कलम आहे. पण या कलमामुळें आपलें फार नुकसान होणार आहे. आज जूरीची पद्धत ज्या ज्या ठिकाणीं चालू आहे त्या त्या ठिकाणीं ती चांगल्या तऱ्हेनें चालली आहे असा

सर्वांचा ग्रह असून असें बिल पुढें येणें व तें पास होणें ह्मणजे अन्याय आहे. ( अशा तऱ्हेनें बऱ्याच माहितीनें भरलेलें भाषण झाल्यावर मि. व्यंकट अय्यर व रा. गुत्तीकर यांचीं भाषणें होऊन हा ठराव पास झाला.

**सहावा ठराव.**—नेटिव संस्थानांतील वर्तमानपत्रांसंबंधानें हिंदुस्थानसरकारानें ता. २९ जून १८९१ रोजीं जो ठराव केला तो अन्यायाचा आहे हें दाखविण्याचा हा ठराव होता व तो सीमोर के यांनीं पुढें आणिला. ते ह्मणाले, सरकारनें हा जो जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे तो असा कीं, " कोणतेंही मासिक पुस्तक अगर वर्तमानपत्र किंवा जाहिरात ज्यांत सरकारी गोष्टींवर टीका केली असेल तें पोलिटिकल एजंटच्या लेखी परवानगीशिवाय कोणीं छापल्यास सात दिवसांचे आंत त्यास हद्दपार केलें जाईल व त्या मुदतींत तो न जाईल तर त्यास धक्के मारून हद्दपार केलें जाईल. " हा घाणेरडा जाहीरनामा प्रसिद्ध होण्यास मूळ कारण असें झालें कीं, सर लिपेल ग्रिफिन व तरुण होळकर सरकार यांच्या राज्यकारभारासंबंधानें एकदां ईस्टर्न हेरल्ड नामक पत्रांत लेख आला होता. व त्याबद्दल हिंदुस्थानसरकारानें हा कडक जाहीरनामा काढला. ह्याबद्दल शिकंदराबादच्या लोकसभेनें बरीच चळवळ सुरू केली आहे व परवां लाट साहेब हैद्राबादेस आले होते तेव्हां ह्या सभेनें त्यांस मानपत्र देण्याचा विचार करून त्याचा मसुदा लार्ड एल्जिनसाहेबांकडे पाठविला. पण त्यांत ह्या जाहीरनाम्याबद्दल उल्लेख होता, ह्मणून त्यांनीं तें मानपत्र घेण्याचें नाकारिलें. हें कृत्य इंग्रज सरकारच्या धवळ कीर्तीस कालिमा आणणारें आहे, असें मि. सीमोर के ह्यांनीं सांगितल्यावर मि. रामचंद्र पिल्ले यांनीं ह्या ठरावास अनुमोदन दिलें. त्यांत ते ह्मणाले कीं, आफ्रिकेंत इकडून गेलेल्या आपल्या देशबांधवांबद्दल जशी आपल्याला कींव येते, तशी नेटिव संस्थानांतील पत्रकर्त्यांबद्दलही कींव येऊन आपण त्यांजबद्दल प्रयत्न केले पाहिजेत. नंतर आणखी दोन भाषणें होऊन हा ठराव पास झाला.

**अकरावा ठराव.**—कायदे कौन्सिलमध्यें लोकनियुक्त सभासदांना प्रश्न विचारण्याचा जो अधिकार मिळाला आहे त्यांत जास्ती सवलत मिळावी अशाबद्दलचा होता. तो बेळगांवचे मि. नातू ह्यांनीं पुढें आणिला. व मि. गोखले व मि. पी. शिवरामस्वामी यांचीं अनुमोदनें मिळून तो सर्वांनुमतें पास झाला.

**बारावा ठराव.**— सिव्हिल व मेडिकल सर्व्हिससंबंधानें होता. यावर डा. बहादुरजी व नामदार टिळक, मि. व्यंकट रामय्या चेटी, डा. सरकार व डा. भाटवडेकर यांचीं भाषणें झालीं.

**तेरावा ठराव.**— वकील व मुखत्यार वकील यांचेसंबंधानें जें बिल सरकारपुढें आहे त्याबद्दल होता, व तो पास झाला.

**चवदावा ठराव.**—जमिनीचा धारा बंगालप्रांताप्रमाणें कायमचा असावा अशाबद्दलचा होता. यावर मि. समर्थ यांनीं फार सुरस भाषण केलें.

**पंधरावा ठराव.**—मध्यप्रांतांतील लोकांच्या वतीनें व्हाइसराय साहेब यांच्या कौन्सिलमध्यें मुखत्यार पाठविण्यासंबंधाचा होता. व तो मि. भगीरथप्रसाद यांनीं पुढें आणला व त्यास मि. गोखले यांनीं अनुमोदन दिलें.

**सोळावा ठराव.**—हुंडणावळीबद्दल होता. तो पास झाला.

या प्रमाणें एकंदर सव्वीस ठराव सर्वांनुमतें पास होऊन व पुढील ह्मणजे १८९६ सालची हिंदुस्थानची १२ वी राष्ट्रीय सभा कलकत्त्यास भरावी असा ठराव झाला आणि ११ व्या राष्ट्रीय सभेचें काम निर्विघ्नपणें पार पडलें.

या प्रसंगीं राष्ट्रीय सभेवरील लोकांचें अकृत्रिम प्रेम चांगलें व्यक्त झालें.

अशा तऱ्हेच्या या राष्ट्रीय सभेपासून आपल्या देशाचा फार फायदा होणार आहे करितां सर्वांनीं या सभेस द्रव्यद्वारा व शरीरद्वारा मदत करावी, अशी विनंति करून हा लेख पुरा करतों.